# विद्युत लोकपाल (मुंबई)
(विद्युत अधिनियम २००३ च्या कलम ४२(६) अंतर्गत)

अभिवेदन (Representation) क्रमांक ९४ / २०२४

मीटर बदलून देण्यास विलंब केल्याने नुकसान भरपाई मिळणेबाबत

विठ्ठल पुंडलिक चोपडे................................................................................................ अपिलार्थी
श्रीधर घरगे (वापरकर्ता)

विरूध्द

महाराष्ट्र वीज वितरण कंपनी मर्यादीत (महावितरण) इचलकरंजी ......................................... प्रतिवादी

उपस्थिती :-

अपिलार्थीतर्फे :- १. श्रीधर घरगे
२. राजेंद्र घनकुटे

प्रतिवादींतर्फे :- १. प्रशांत राठी, कार्यकारी अभियंता
२. सुनील अकिवाटे, उपकार्यकारी अभियंता

कोरम :- वन्दना कृष्णा (भा.प्र.से. निवृत्त)

सुनावणी तारीख :- १८ जुलै २०२४

आदेश पारित दिनांक :- २५ जुलै २०२४

## आदेश

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच व विद्युत लोकपाल) विनियम २०२० (ग्राहक गाऱ्हाणे व विद्युत लेकपाल विनियम २०२०) मधील विनियम १९.१ अन्वये ग्राहक गाऱ्हाणे निवारण मंच, महावितरण बारामती परिमंडळ (मंच) यांच्या दिनांक १५ मार्च २०२४ रोजीच्या आदेशाविरुध्द (तक्रार क्रमांक ०६/२०२४) उपरोक्त अपिलार्थीने सदरचे अभिवेदन दिनांक २१ मे २०२४ दाखल केले. मंचाने तक्रारदार यांचे गाऱ्हाणे अंशतः मंजूर केले व सदरहू आदेश खालीलप्रमाणे आहे.

*"(२) तक्रारदार ग्राहकास जळालेले मीटर बदलून देण्यासाठी झालेल्या विलंबाबाबत वि.प. वितरण कंपनीने रक्कम रु.५००/- नुकसान भरपाई देण्यात यावेत."*

२. अपिलार्थीने त्यांच्या निवेदनातील व दिनांक १८ जुलै २०२४ रोजीच्या व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे.

- अपिलार्थी हे गट नं. ३२ / ए, श्रीरामनगर, गल्ली नं. २, ता. हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर येथे २०२१ सालापासून महावितरणचे औद्योगिक ग्राहक (क्रं.२५०४८७१००६४८) आहेत. अपिलार्थीने सदर वीज जोडणीची जागा मेसर्स केतकी इडंस्ट्री, प्रोपा. सौ. वैशाली श्रीधर खारगे यांना ऑक्टोबर २०२१ सालापासून भाडेतत्वावर देण्यात आलेली असून, त्या जागी ते सोडा बॉटल बनविण्याचा व्यवसाय करीत आहेत.

- अपिलार्थीच्या ठिकाणावर मीटरमध्ये दिनांक १४ मे २०२३ रोजी रात्री ९.३० वाजता स्फोट झाल्याने वीज खंडीत झाली. सदर जळीत मीटर बदलून मिळावा म्हणून दिनांक १५ मे २०२३ रोजी महावितरणच्या कार्यालयात अर्ज दिला. त्यानंतर महावितरणने दिनांक १६ मे २०२३ रोजी नवीन बदली मीटरकरीता कोटेशन दिले. दिनांक १७ मे २०२३ रोजी सदर कोटेशनच्या रक्कमेचा भरणा केला. त्यानंतर वीज देयक दुरूस्ती करून मिळावे असे लेखी कळविले. परंतू त्यास काही उत्तर आले नाही, म्हणून अपिलार्थीने दिनांक २९ मे २०२३ रोजी पुन्हा पत्र दिले व मीटरसाठी कोटेशनप्रमाणे पैसे भरलेले असून लवकरात लवकर मीटर बदलून मिळावा, असे कळविले. त्यानंतर २० दिवसांनी म्हणजे दिनांक १९ जून २०२३ रोजी मीटर बदलला.

- मीटर खराब असल्यामुळे तो जास्त युनीट दाखवत असल्याचे अपिलार्थीच्या निदर्शनास आले. अपिलार्थीचा व्यवसाय हा हंगामी असल्यामुळे २०२१-२२ चे वापरलेले युनीट हे सीपीएल च्या नोंदीनुसार दुरूस्त करून देण्यात यावे म्हणून पत्रव्यवहार केला. परंतू त्यास कोणतेही उत्तर आले नाही, म्हणून मंचाकडे तक्रार दाखल केली. मंचाच्या आदेशानुसार महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वॉलीटी) विनियम २०२१ (विद्युत पुरवठा संहिता, कृतीची मानके विनियम २०२१) च्या कलम १५.२.२ नुसार वीज पुरवठा आणि मीटर सुयोग्य स्विच गिअर बसविणे हे वीज वितरण कंपनीची जबाबदारी असतानाही मीटर योग्य कालावधीत बदलला गेला नाही. त्यामुळे कलम २५ नुसार भरपाईचे निश्चितीकरण जोडपत्र २ मधील पुरवठयाचे कार्य / घटना क्र.२ विद्युत पुरवठा पुर्ववत

करणे मधील (५) मधील जळालेला मीटरविषयी ग्रामीण क्षेत्रामध्ये १८ तासांच्या आत मीटर बदलून देणे बंधनकारक असताना मीटर बदलून न दिल्यास तक्रारदार ग्राहकास देय भरपाई म्हणून लघुदाब ग्राहकांसाठी रु.५०/- विलंबाच्या प्रती तासास किंवा भागास कमाल रु.५००/- च्या अधीन राहून भरपाईचे निश्चितीकरण केलेले आहे. त्यानुसार मंचाने अपिलार्थीस रु.५००/- भरपाई दिली आहे.

- अपिलार्थीचा मीटर १ महिन्याच्या कालावधीनंतर बदलण्यात आल्याने सदर कालावधीत अपिलार्थीचे कामकाज पुर्णपणे ठप्प होते. महावितरणने पर्यायी मार्गही सुचविला नाही. तथापी, अपिलार्थीचे वीजे अभावी अंदाजे रक्कम रु.१,७०,०००/- चे नुकसान झाले. मंचाने दिलेली नुकसान भरपाई अत्यंत कमी असल्यामुळे अपिलार्थीने रु.१७००००/- चे नुकसान भरपाई मिळावी म्हणून मा.विद्युत लोकपाल (मुंबई) कार्यालयामध्ये सदर अभिवेदन दाखल केले.

३. प्रतिवादीने त्यांच्या निवेदनातील व दिनांक १८ जुलै २०२४ रोजीच्या व्हिडीओ कॉन्फरसिंगद्वारे झालेल्या सुनावणीदरम्यान सादर केलेले प्रमुख मुद्दे खालील प्रमाणे आहेत.

- अपिलार्थी हे गट नं. ३२ / ए, श्रीरामनगर, गल्ली नं. २, ता. हातकणंगले, जिल्हा कोल्हापूर येथे २०२१ सालापासून महावितरणचे औद्योगिक ग्राहक (क्रं.२५०४८७१००६४८) आहेत. अपिलार्थीने सदर वीज जोडणीची जागा मेसर्स केतकी इडंस्ट्री, प्रोपा. सौ. वैशाली श्रीधर खारगे यांना ऑक्टोबर २०२१ सालापासून भाडेतत्वावर देण्यात आलेली असून त्या जागी ते सोडा बॉटल बनविण्याचा व्यवसाय करत आहेत.

- अपिलार्थीचा मीटर दिनांक १४ मे २०२३ रोजी जळाल्याने अपिलार्थीकडून मा. आयोगाच्या नियमावलीनुसार दिनांक १७ मे २०२३ रोजी आवश्यक ती मीटरची कॉस्ट भरुन घेण्यात आली. व मीटरच्या उपलब्धतेनुसार प्राधान्याने सदर मीटर दिनांक १९ मे २०२३ रोजी बदलण्यात आला त्यामध्ये महावितरणची कोणत्याही प्रकारची दिरंगाई नाही. अपिलार्थीस मीटरसाठीचे कोटेशन दिनांक १६ मे २०२३ रोजी देण्यात आले. अपिलार्थीने दिनांक १७ मे २०२३ रोजी मीटरच्या कॉस्टचा (कोटेशनच्या रक्कमेचा) भरणा केला. त्यानंतर उपविभागीय कार्यालय इचलकरंजी ग्रामीणचे पत्र क्रं.६०९ दिनांक १७ मे २०२३ नुसार विभागीय कार्यालया इचलकरंजीकडे नव्या मीटरची मागणी केली. त्यानंतर जिनस कंपनीकडून दिनांक ९ जून २०२३ रोजी महावितरणच्या

मागणीनुसार मीटर देण्यात आला व नंतर तो दिनांक १९ जून २०२३ रोजी अपिलार्थीस देण्यात आला.

- विद्युत पुरवठा संहिता, कृतीची मानके विनियम २०२१ मधील कलम २५ मधील भरपाईचे निश्चितीकरणबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. त्यामधील पुरवठयाचे कार्य / घटना क्रमांक २ विद्युत पुरवठा पुर्वरत करणे मधील (पाच) मध्ये जळालेला मीटर विषयी ग्रामीण क्षेत्रामध्ये १८ तासाच्या आतमध्ये वीज पुरवठा वितरण कंपनीने मीटर बदलून देणे बंधनकारक आहे. मीटर बदलून दिल्यास तक्रारदार ग्राहकास देय भरपाई म्हणून लघुदाब ग्राहकांसाठी रु.५०/- विलंबाच्या प्रतितास किंवा त्याच्या भागास कमाल रु.५००/- रक्कमेला अधिन राहून भरपाईचे निश्चितीकरण केले आहे.

- अपिलार्थीस मीटरची रक्कम भरणेबाबत किंवा स्वतः वीज मीटर खरेदी करून कंपनीकडून चाचणी करून घेण्याचे दोन्ही पर्याय सुचवीले होते. परंतू, महावितरणची मीटर किंमत बाजारभावापेक्षा कमी असल्यामुळे जळालेले मीटर महावितरणकडे जेव्हा मीटर उपलब्ध होतील, तेव्हा, बदली करून मिळतील, असे कळविले व त्यास अपिलार्थीची कोणतीही हरकत नसलेबाबत त्यांनी तोंडी सहमती दर्शवली होती. तसेच, मीटर जळालेल्या कालावधीत वीज पुरवठा चालू करून घेण्यासाठी (अन्य पर्यायाने) अपिलार्थीने कोणताही अर्ज महावितरणकडे केलेला नव्हता. मात्र, मीटरच्या उपलब्धतेनुसार अपिलार्थीचे मीटर ताबडतोब बदलून देण्यात आले. अपिलार्थीस मीटर बदलून देण्यास उशीर झाला म्हणून महावितरणने मंचाच्या आदेशानुसार नुकसानभरपाई पोटी महत्तम देय रक्कम रु.५००/- देण्यात आलेले असून मंचाच्या आदेशाचे पालन केलेले आहे.

- वरील सर्व मुद्दयांचा विचार करता अपिलार्थीने दाखल केलेली तक्रार चुकीची असून ती फेटाळण्यात यावी ही नम्र विनंती.

**<u>विश्लेषण व निर्णय</u>**

४. दोन्ही पक्षकारांचे म्हणणे ऐकण्यात आले व उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन करण्यात आले.

५. अपिलार्थी हे सन २०२१ सालापासून महावितरणचे औदयोगिक ग्राहक (क्रं.२५०४८७१००६४८) आहेत. अपिलार्थीने सदर वीज जोडणीची जागा मेसर्स केतकी इडस्ट्री, प्रोपा. सौ. वैशाली श्रीधर खारगे यांना ऑक्टोबर २०२१ सालापासून सोडा बॉटल बनविण्याचा व्यवसायाकरीता भाडेतत्वावर दिली आहे. सदर ठिकाणी दिनांक १४ मे २०२३ रोजी मीटरमध्ये स्फोट झाल्याने वीज पूरवठा खंडीत झाला; म्हणून मीटर बदलून मिळावा या करीता दिनांक १५ मे २०२३ रोजी महावितरणच्या कार्यालयात अर्ज दिला. त्यानंतर महावितरणने दिनांक १६ मे २०२३ रोजी नवीन मीटरचे कोटेशन दिले. दिनांक १७ मे २०२३ रोजी सदर कोटेशन रक्कमेचा भरणा केला. अपिलार्थीस मीटर खराब असल्यामुळे ते जास्त युनीटचा वीज वापर दर्शवित असल्याचे अपिलार्थीच्या निदर्शनास आले. त्यानंतर अपिलार्थीनी वीज देयक दुरूस्ती करून मिळावे असे लेखी कळविले. परंतू त्यास काही उत्तर आले नाही; म्हणून दिनांक २९ मे २०२३ रोजी अपिलार्थीनी पुन्हा पत्र देऊन लवकरात लवकर मीटर बदलून मिळावा असे कळविले. त्यानंतर २० दिवसांने म्हणजे दिनांक १९ जून २०२३ रोजी मीटर बदलला. विद्युत पुरवठा संहिता, कृतीची मानके विनियम २०२१ च्या कलम १५.२.२ नुसार नवीन मीटर बसविणे ही वीज वितरण कंपनीची जबाबदारी असतानाही मीटर योग्य कालावधीत बदलला गेला नाही. सदर मीटर १ महिन्याच्या कालावधीनंतर बदलण्यात आल्याने सदर कालावधीत अपिलार्थीचे कामकाज पूर्ण ठप्प झाले होते. वीज पुरवठयाबाबत महावितरणने पर्यायी मार्गही सांगितला नाही. वीजे अभावी अपिलार्थीचे अंदाजे रक्कम रु.१,७०,०००/- चे नुकसान झाले; म्हणून कलम २५ नुसार भरपाईचे निश्चितीकरण जोडपत्र २ मधील पुरवठयाचे कार्य / घटना क्र.२ नुसार नुकसान भरपाई मिळण्यासाठी सदर अभिवेदन दाखल केले आहे.

६. प्रतिवादीने असे नमुद केले की, अपिलार्थीचा मीटर दिनांक १४ मे २०२३ रोजी जळाल्याने अपिलार्थीकडून मा. आयोगाच्या नियमावलीनुसार दिनांक १७ मे २०२३ रोजी आवश्यक असलेली मीटरची कॉस्ट भरून घेण्यात आली. मीटरच्या उपलब्धतेनुसार सदर मीटर प्राधान्याने दिनांक १९ मे २०२३ रोजी बदलण्यात आला, त्यामध्ये महावितरणची कोणत्याही प्रकारची दिरंगाई नाही. विद्युत पुरवठा संहिता, कृतीची मानके विनियम २०२१ मधील कलम २५ मधील भरपाईचे निश्चितीकरणबाबत मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार वीज पुरवठा वितरण कंपनीने मीटर बदलून देणे बंधनकारक आहे. मीटर बदलून दिल्यास तक्रारदार ग्राहकास देय भरपाई म्हणून लघुदाब ग्राहकांसाठी रु.५०/- विलंबाच्या प्रतितास किंवा त्याच्या भागास कमाल रु.५००/- च्या अधिन राहून भरपाईचे निश्चितीकरण केले आहे. अपिलार्थीस मीटरची रक्कम भरणेबाबत किंवा स्वतः वीज मीटर खरेदी करून कंपनीकडून चाचणी करून घेण्याचे दोन्ही पर्याय सुचवीले होते. परंतू महावितरणची मीटर किंमत बाजारभावापेक्षा कमी असल्यामुळे जळालेले मीटर महावितरणकडे जेव्हा मीटर उपलब्ध होतील तेव्हा बदली करून मिळतील असे कळविले व त्यास

अपिलार्थीची कोणतीही हरकत नसलेबाबत त्यांनी तोंडी सहमती दर्शवली होती. तसेच, मीटर जळालेल्या कालावधीत वीज पुरवठा चालू करुन घेण्यासाठी (अन्य पर्यायाने) अपिलार्थीने कोणताही अर्ज महावितरणकडे केलेला नव्हता म्हणून सदर कालावधीत अपिलार्थीची वीज जोडणी बंद होती. मीटरच्या उपलब्धतेवर अपिलार्थीचे मीटर ताबडतोब बदलून देण्यात आले. अपिलार्थीस मीटर बदलून देण्यास उशीर झाला म्हणून मंचाच्या आदेशानुसार महावितरणने नुकसानभरपाई म्हणून रु.५००/- दिलेले आहेत व मंचाच्या आदेशाचे पालन केलेले आहे.

७. 'महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (विद्युत पुरवठा संहिता, वितरण परवानाधारकांच्या कृतीची मानके आणि पॉवर क्वालिटी) विनियम, २०२१' मध्ये जोडपत्र २ नुसार खालीलप्रमाणे तरतूद आहे.

जोडपत्र - २

कृतीच्या मानकांची पूर्तता न केल्यामुळे ग्राहकांना द्यावयाची भरपाई

<u>विद्युत पुरवठा पूर्ववत करणे</u>

| पुरवठयाचे कार्य / घटना | | मानक | देय भरपाई |
|---|---|---|---|
| ७. अन्य सेवा | | | |
| (चार) | वितरण रोहीत्र आणि संलग्न स्विचगिअरमध्ये बिघाड | अठरा (१८) तास (नागरी क्षेत्रात) | लघुदाब ग्राहकांसाठी रु.५०/- विलंबाच्या प्रति तासास किंवा त्याच्या भागास कमाल रु. ५००/- च्या अधीन राहून |
| | | अठ्ठेचाळीस (४८) तास (ग्रामीण क्षेत्रात) | |
| (पाच) | जळालेले मीटर | अठरा (१८) तास (नागरी क्षेत्रात) | |
| | | अठ्ठेचाळीस (४८) तास (ग्रामीण क्षेत्रात) | |

अपिलार्थीने नुकसान भरपाईपोटी रक्कम रु.१,७०,०००/- ची मागणी केली आहे. याबाबत असे स्पष्ट करण्यात येते की, '<u>अप्रत्यक्ष नुकसान भरपाई देण्याची</u>' ग्राहक गाऱ्हाणे विनियम २०२० या विनियमात कोणतीही तरतूद नाही. या संदर्भात विनियम क्र.२०.४ (इ) ची तरतूद लक्षात घेणे गरजेचे आहे.

*"२०.४ (इ) ग्राहकाने सहन केलेल्या कोणत्याही तोटा किंवा नुकसानीकरीता तो (विद्युत लोकपाल) निवाडा देईल ती रक्कम भरपाई म्हणून तक्रारदाराला अदा करण्याचा निर्देश; आणि / किंवा*

*परंतू तथापि असे की, ग्राहकाला कोणत्याही प्रकरणी, अप्रत्यक्ष, परिणामस्वरूप, आनुषंगिक, दंडात्मक किवा दहशती नुकसान, संधी अथवा लाभाचे नुकसान यासाठी भरपाई मिळण्याचा हक्क राहणार नाही; "*

८. अपिलार्थीने नुकसान भरपाईपोटी रक्कम रु.१,७०,०००/- ची मागणी सोडता दुसरी मागणी केल्याचे अभिवेदनात दिसत नाही. मंचाने त्यांच्या १५ मार्च २०२४ रोजीच्या आदेशात या सर्व बाबींचा योग्य तो उहापोह केला आहे व कमाल पात्र रु.५००/- भरपाई दिली आहे. त्यामुळे मंचाने जारी केलेल्या आदेशात फेरफार वा हस्तक्षेप करण्याची गरज वाटत नाही. सबब, मंचाचे आदेश कायम ठेवण्यात येत आहेत.

९. अपिलार्थीचे अभिवेदन फेटाळण्यात येत असून निकाली काढण्यात येत आहे.

खरी प्रत असल्याचे प्रमाणित

सही/-
(वन्दना कृष्णा)
विद्युत लोकपाल (मुंबई)